# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com


# <u>वार्तापत्र</u>

दिनांक ०९/०५/२०१९

दिनांक ८.५.२०१९ चे रात्रौ दरम्यान उप विभाग एटापल्ली अंतर्गत उप पोलीस स्टेशन कसनसुर हद्‌दीतील मौजा घोटसुर ते कारका रोडवर कारका गावाजवळ पंतप्रधान ग्राम सडक योजना अंतर्गत सुरु असलेल्या रोडच्या कामावरील मिक्सर व पाण्याचे टॅंकर नक्षलवादयांनी जाळले आहे.घोटसुर ते कारका रस्त्याच्या बांधकामामुळे कारका व त्या परिसरातील १५ ते २० अति दुर्गम गावांतील आदिवासी जनतेला फायदा होणार आहे. त्याच बरोबर या दुर्गम भागात राहणाऱ्या जनतेला पावसाळयाच्या दिवसांत रस्ते नसल्याने जाणे-येणे जिकरीचे होते.

शासनातर्फे आदिवासी जनतेच्या विकासाकरीता विविध योजना राबविण्यात येत असुन गावागावात रस्ते, वीज, दवाखाने यांसारख्या मुलभुत सोई सुविधा पोहचविण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. परंतु आपण आदिवासी जनतेचे तारणहार आहोत असे स्वत:ला म्हणुन घेणारे नक्षलवादी आदिवासींना मिळणाऱ्या मुलभुत सोई सुविधांपासुन आदिवासी जनतेला वंचित ठेवण्याकरीता विकास कामांत अडथळे निर्माण करीत आहेत. वरिष्ठ कॅडरचे तेलगु नक्षलवादयांना येथील आदिवासी जनतेची सामाजिक व आर्थिक उन्नती होवु दयायची नाही व त्यांना येथील जनतेच्या विकासाशी काहीएक देणे घेणे नसल्याने ते येथील स्थानिक नक्षलवादयांकडुन अशी कृत्ये करुन घेवुन आदिवासी जनतेची पिळवणुक करीत आहेत.

सामान्य जनतेने नक्षलवादयांच्या या दबाबतंत्राला बळी न पडता नक्षलवादयांना व त्यांचा विकास कामात अडथळा निर्माण करण्याच्या घटनांचा विरोध करुन नक्षल गावबंदीची मोहीम तिव्र करावी असे आवाहन पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री शैलेश बलकवडे यांनी केले आहे.